C:\DATA - D\वाहन तळ.doc
216

जा.क्र.नांवाशमनपा/जवमा/४107/२०२४
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक - 18/07/2024

# ई-लिलाव सुचना

सर्व वाहनतळ ठेकेदारांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील **डॉ.लेन शिवाजीनगर, वाडीया फॅक्ट्री येथील वाहनतळ** चालविणेसाठी जागेचा मक्ता ताबा तारखेपासुन ते तीन वर्षाच्या कालावधी पर्यंत द्यावयाचा आहे.

ईच्छुक लिलावधारकांना / ठेकेदारांना लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलावाची कोरी निविदा किमंत (Tender Fee) रुपये ५०००/- नापरतावा व इसारा रक्कम EMD रुपये १५,०००/- रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) च्या स्वरुपात सिलबंद लिफाफ्यात आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचे नावे दि. 19/07/2024 रोजी 15.00 वाजे पासुन ते दि. 02/08/2024 रोजी 15.00 वाजे पर्यंत (शासकिय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) मालमत्ता विभाग, मुख्य प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, रुम नं. २१५ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड या कार्यालयाकडे जमा करावेत.

सदरील मक्त्याच्या नियम व अटी (https://eauction.gov.in) या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन वर खरेदी व जमा करण्यात यावे. निविदा फक्त इंटरनेटवर खरेदी करता येतील व ऑनलाईन भरता येतील.

### ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | लिलाव प्रसिध्दीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिध्द दिनांक | 19.07.2024 | 15.00 |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 19.07.2024 | 15.00 |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 02.08.2024 | 15.00 |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | 02.08.2024 | 16.00 |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 06.08.2024 | 18.00 |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 07.08.2024 | 11.00 |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 07.08.2024 | 14.00 |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत:-
१) संपादक, दै. नांदेड अग्रारी(म), दै. नगुडे (उ) यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील लिलावाची जाहिर सुचना आपल्या दि. 19/07/2024 च्या वृत्तपत्रात 16X20 चौ.मी. आकारात कमीत कमी जागेत प्रसिध्द करुन बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.
२) मुख्यलेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४) अंतर्गत लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
६) जनसंपर्क अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड नांदेड यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

अतिरिक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे वाडीया फॅक्ट्री येथील वाहनतळ चालविण्यासाठी द्यायवयाच्या मक्त्याच्या नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.</u>**

१) ई-लिलावात भाग घेण्यासाठी ई-लिलाव फिस रुपये ५०००/- ना परतावा व इसारा (EMD) रुपये १५०००/- (अक्षरी - पंधरा हजार रुपये फक्त) राहिल.

२) सदरील वाहनतळाच्या ई-लिलावासाठी सरकारी बोली ही रु.९१,१३५/- (अक्षरी - एक्याण्णव हजार एकशे पसतीस रुपये फक्त) राहील. तसेच बोली हजार च्या पटीमध्ये बोलने अनिवार्य आहे.

३) कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयामध्ये वाहनतळ ठेकेदार म्हणून काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.

४) पॅन कार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स, जी.एस.टी. नंबर इ. कार्यालयात जमा करावे लागेल.

५) सुरक्षा ठेव रक्कम म्हणून ५०,०००/- रुपये कार्यालयात जमा केल्यानंतरच वाहनतळ मक्ता परवाना देण्यात येईल.

६) मक्त्याचा कालावधी ताबा तारखेपासून तीन वर्षाकरिता प्रती वर्ष १० टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे राहिल. जाहिर ई-लिलावात ज्याची बोली रक्कम जास्त (मनपास मान्य असल्यास) त्याचे नावे मक्ता देण्यात येईल. बोलीत आलेल्या रक्कमेची २५ टक्के रक्कम सात दिवसाच्या आत महानगरपालिकेत जमा करून परवाना घ्यावे लागेल. उर्वरित रक्कम समान तीन त्रैमासिक हफ्त्यामध्ये कार्यालयात जमा करावी लागेल. रक्कम जमा करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिन रु.५००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. मक्त्याची रक्कम १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीस थकीत राहिल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.

७) वाहनतळावर लावण्यात येणाऱ्या कामगारांचे इएसआय (राज्य कर्मचारी विमा) ॲक्ट १९४८ अंतर्गत संरक्षण देणे व सहभाग रक्कम भरणे बंधनकारक राहिल. तसेच कामगारांची ईपीएफ रक्कम नियमाप्रमाणे भरणे बंधनकारक राहिल व त्याबाबतची अभिलेखे ठेवण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहिल.

८) वाहनतळासाठी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या वाहनतळाच्या दराच्या पावत्यावर महानगरपालिकेकडून प्रमाणित करून घेतल्या शिवाय पावत्याचा वापर करता येणार नाही. **अप्रमाणित पावत्यांचा वापर केल्यास फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात येईल.** महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या दरपत्रकापेक्षा अधिक दराने वाहनतळ दराची आकारणी व वसुली होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९) नैसर्गिक अथवा इतर कारणाने नुकसान झाल्यास किंवा वाहन चोरीस गेल्यास त्यास आपली जबाबदारी राहिल. त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. यासाठी माफी अथवा नुकसान भरपाईसाठी अर्ज करता येणार नाही.

१०) वाहनतळ जागेतच वाहने उभी करावीत रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११) वाहनतळाच्या जागेचा इतर कोणत्याही प्रकारच्या व्यवसायासाठी वापर करता येणार नाही व असे केल्यास मक्ता रद्द करण्यात येईल.

१२) सदरील मक्त्याचे पूर्ण अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहतील व तो निर्णय आपणास बंधनकारक राहिल.

१३) वाहनतळाचे दर खालील प्रमाणे राहतील व त्याप्रमाणे दरफलक दर्शनी भागावर ठळक अक्षरात लावावे लागतील.

१४) महानगरपालिके तर्फे नियमाप्रमाणे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाची अंमलबजावणी करावी लागेल. नियमा विरुद्ध कृती केल्यास व आदेशाचे पालन न केल्यास परवाना रद्द करून अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात येईल व पुनश्च ई-लिलाव करण्यात येईल.

१५) १००/- रुपयेच्या बॉन्ड पेपरवर उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत मक्ता करारनामा करून द्यावा लागेल.

| | |
|---|---|
| **१) कार व इतर (तीन तासाकरीता)** | **रु.५.०० (अक्षरी रुपये पाच फक्त)** |
| **२) मोटार सायकल व ॲटोरिक्षा इरत मोपेड (तीन तासाकरीता)** | **रु.३.०० (अक्षरी रुपये तीन फक्त)** |
| **३) सायकल (तीन तासाकरीता)** | **रु.२.०० (अक्षरी रुपये दोन फक्त)** |

पुढील प्रत्येक तासाकरिता वर प्रमाणे अतिरिक्त दर आकारण्यात येईल.

**अतिरिक्त आयुक्त**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड**